संकल्प

वार्षिकांक २०२०–२१

कोविड – १९
एक वैश्विक झंझावात

अतुल विद्या मंदिर, वर्धा व्दारा संचालित

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज

चांदूर रेल्वे, जि. अमरावती

नॅक, बेंगलुरु द्वारे ‘बी$^{+}$’ नामांकन प्राप्त

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज शिक्षक वृंद

कोविड -१९ एक वैश्विक झंझावात

संकल्प

वार्षिकांक

२०२०-२०२१

♦ **प्रकाशक-**

प्राचार्य,

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे

♦ **संपादक मंडळ**

मुख्य संपादक

डॉ. मिनल केचे, विभाग प्रमुख, वनस्पती शास्त्र

♦ **सहसंपादक**

डॉ. संघपाल पाढेण, सहा. प्राध्यापक, रसायन शास्त्र विभाग

प्रा. प्रवीण चव्हाण, कुलदिप सोळंके, (भाषा विभाग)

♦ **मुद्रक**

श्री. गुरुदेव प्रिन्टर्स, महात्मा फुले संकुल,

शेगाव नाका, अमरावती.

सर्वहक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

या अंकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. ते मत त्या त्या लेखकांचे समजावे.

अतुल विद्या मंदिर, वर्धा द्वारा संचालित

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज

चांदूर रेल्वे, जि. अमरावती.

आदरांजली



स्व. अतुल वा. जगताप

एम.कॉम. एम.बी.ए.

आमचे प्रेरणास्थान

स्व.मा.प्रा. अण्णासाहेब जगताप

संस्थापक अध्यक्ष,

अतुल विद्या मंदिर, वर्धा

अतुल विद्या मंदिर (वर्धा)

रजि. नं. महा. ८७/९१ व एफ – १३३५ वर्धा

कार्यकारी समिती

१.	स्व. प्रा. अण्णासाहेब उर्फ वाल्मीकराव जगताप	संस्थापक अध्यक्ष
२.	प्रा. सौ. उत्तराताई वी. जगताप	अध्यक्षा
३.	डॉ. मिलींद वा. जगताप	उपाध्यक्ष
४.	डॉ. वैष्णवी प. जगताप	उपाध्यक्ष
५.	प्रा. वीरेंद्र वा. जगताप	सचिव
६.	प्रा. डॉ. राजीव एम. जाधव	सहसचिव
७.	श्री. परिक्षीत वि. जगताप	कोषाध्यक्ष
८.	श्री. सुधिर व. जगताप	सदस्य
९.	डॉ. सौ. वर्षा एम. जगताप	सदस्य
१०.	श्री. गोपाल एम. चौधरी	सदस्य
११.	श्री. मिहीर एम. जगताप	सदस्य
१२.	श्री. दिनेश एन. घारफळकर	सदस्य

डॉ. राजेश श. जयपूरकर
एम.एस्सी. (टेक), पीएच.डी.
प्र–कुलगुरु

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती – ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

नॅक 'अ' श्रेणी मानांकन प्राप्त

क्रमांक : संगाबाअवि/पीव्हीसी/१९३/२०२१
दिनांक : २६/०८/२०२१

–: शुभसंदेश :–

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राजर्षी शाहु कॉलेज, चांदुर रेल्वे जि. अमरावती येथील वार्षिकांक **'संकल्प'** २०२०–२०२१ प्रकाशित होत आहे. या महाविद्यालयातील वार्षिकांकात विद्यार्थ्यांचे प्रतिभेतून साकारलेले सध्याचे ज्वलंत विषय 'कोविड–१९ एक वैश्विक झंझावात' या विषयाच्या माध्यमातुन विचार मांडण्याची संधी महाविद्यालयानी उपलब्ध करून दिली आहे. तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व साहित्याच्या माध्यमातुन नवे विचार नवा संदेश समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य **'संकल्प'** या वार्षिकांकाव्दारे साकार होईल अशी आशा आहे.

'संकल्प' वार्षिकांक २०२०–२०२१ करिता मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.

(डॉ. राजेश श. जयपूरकर)
प्र–कुलगुरु,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

दुरध्वनी क्र. कार्यालय–०७२१–२५५११९३१ निवास–०७२१–२६७२७०२ फॅक्स क्र. ०७२१–२६६२१३५
Website : www.sgbau.ac.in E-mail : provc@sgbau.ac.in

SENIOR COLLEGE FACULTY

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज

चांदूर रेल्वे, जि. अमरावती.

आधारस्तंभ व व्यवस्थापन समिती प्रमुख

मा. प्रा. सौ. उत्तराताई वी. जगताप

अध्यक्षा

डॉ. वैष्णवी पी. जगताप

उपाध्यक्षा

मा. डॉ. मिलींद वा. जगताप

उपाध्यक्ष

मा. प्रा. वीरेंद्र वा. जगताप

सचिव

मा.श्री. परिक्षीत वी. जगताप

कोषाध्यक्ष

कोविड– १९ या वैश्विक महामारी विरुद्ध लढा देणाऱ्या सर्व वीर योद्ध्यांना विनम्र अभिवादन....

राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने कोविड १९ या वैश्विक महामारी विरुद्ध लढा देणाऱ्या सर्व वीर योद्ध्यांना समर्पित' संकल्प 'वार्षिकांक प्रकाशित होत असल्याबद्दल विशेष आनंद होत आहे . खरंतर २०२०– २१ हे शैक्षणिक वर्ष या वैश्विक महामारी ने ग्रासलेले आहे. ज्या कालावधीत महाविद्यालयात स्नेहमिलन सोहळा, सहली, सुप्त गुणांना वाव देणारी विविध गुणदर्शन कार्यक्रम यांच्या माध्यमातून नवचैतन्य बहरण्याचा कालखंड परंतु याच दरम्यान अनपेक्षित अचंबित करणारी घटना घडली. ती म्हणजे कोरोना या महामारीने हळूहळू संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले याची प्रचिती कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घडली. आपण या संकटाला धीराने, संयमाने सामोरे जात आहोत कारण एक दिवस आपण नक्कीच या संकटावर मात करू या आशेने आपल्याला मार्गक्रमण करायचे आहे. कोरोना एक वैश्विक झंजावात आहे या वादळात टिकून राहण्यासाठी एकजुटीने खंबीर उभे राहण्याची गरज आहे.

कोरोना विषाणू संसर्गाच्या जागतिक संकटात सर्वत्र ताळेबंद व संचारबंदी लावण्यात आली यामुळे जीवन चक्राला काही प्रमाणात अडथळे निर्माण झाले. परंतु आपल्या कर्तव्यापासून दूर न जाता मानवतावादी दृष्टिकोन ठेवून कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून या भीषण महामारीत कोरोना विरुद्ध लढा देणाऱ्या सर्व योद्ध्यांचे काम कधीच थांबलं नाही.त्याग, समर्पण देशभक्ती, निष्ठा याची साक्ष देत या योद्ध्यांनी देवदूताची भूमिका पार पाडली त्या सर्वांच्या कार्याला मनापासून सलाम.

''सेवेचे अनंत प्रकार । ते समजुनी करावी निरंतर ।
आपणाशी साधेल तो व्यवहार । सेवाभावाने करावा ''।।

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ओविची सार्थकता या काळामध्ये पटली. तन, मन, धनाने केलेले कार्य हे राष्ट्रभक्तीचे उदाहरण आहे.

कोवीड – १९या महामारीने सर्वच घटकावर प्रभाव टाकला. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक ही सर्वच घटक प्रभावित झाली. कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आरोग्यविषयक अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या. ताळेबंद च्या काळात विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढणे, शिक्षणात खंड न पडता अखंडितपणे अध्यापन कार्य सुरू राहावे म्हणून कोरोना विषाणूच्या जागतिक संकटात सुद्धा शिक्षकांनी ऑनलाइन पद्धतीने शिकवण्याचा प्रयत्न केला.काळाची हाक ओळखून आपल्या संस्थेने सुद्धा डिजिटल प्लॅटफॉर्म द्वारे शिक्षणाला स्वीकारले. ऑनलाईन अध्यापनात नव्याने सामोरे जात असताना तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ज्ञानगंगा अविरतपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शिक्षण कार्य समर्थपणे पेलत आहे ही बाब कौतुकास्पद आहे.

संकल्प या वार्षिकाच्या माध्यमातून विद्यार्थी वर्ग ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधन वृत्ती ठेवून समाजाप्रती आपले उत्तरदायित्व ठेवून आपल्या लेखणीतून साहित्याची निर्मिती करतो यामुळे मनस्वी आनंद होतो आहे. म्हणून या विशेषांकाला शुभ संदेश व्यक्त करीत आहे.

धन्यवाद !

UJagtap

प्रा. उत्तराताई वी. जगताप
अध्यक्षा,
अतुल विद्या मंदिर (वर्धा)

प्राचार्यांचे मनोगत...

"श्रृंखला पायी असु दे
मी गतीचे गित गाई
दुःख उधळल्यास आता
आसवांना वेळ नाही"
– बाबा आमटे

बाबा आमटेंच्या वरील ओळी आठवण्याचे कारण की, मागल्या जवळपास दोन वर्षापासुन आपण सर्व कोरोनासारख्या महाभयंकर साथीच्या रोगाशी लढत आहोत. या काळाणे आपल्या जगण्याची परीमाणे बदलली आहेत. अनेकांची आयुष्य पालटली संबंध मानवजातीवरील हे अनिष्ट थांबता थांबत नाही. असे असले तरी मानवी जीवन अव्याहत सुरू राहील असा विश्वास आमटेंच्या या दोन ओळी सतत देत असतात म्हणुनच काय की, महाविद्यालयामध्ये शैक्षणिक कार्य आभासी पध्दतीने सुरु आहे, विद्यार्थी शिक्षक पुनः त्याच जोमाने पूर्वीसारखे महाविद्यालय कधी सुरू होईल याबाबत साशंक आहेत अशा या प्रचंड अनिश्चिततेच्या काळात आपले महाविद्यालय विद्यार्थीपयोगी कार्यक्रम आवर्जुन घेत आहे त्यातीलच एक म्हणजे आपल्या महाविद्यालयाचा'संकल्प' हा वार्षिकांक होय. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे विद्यार्थी या सर्व घटकांसाठी आपला वार्षिकांक एक उत्तम संधी असते आपल्यातील सृजनात्मकता अभिव्यक्त करायची मागच्या शैक्षणिक वर्षात पार पाडलेल्या विद्यार्थी हीताय कार्यक्रमांचा आणि तत्सम घटनांचा मागोवा घेण्याची या वार्षिकांकामुळे आपल्या संस्थेचे व महाविद्यालयाचे एकदंर रूप समाजासमोर प्रतिबिंबीत होत असते.

आपल्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. सौ. उत्तराताई जगताप, सचिव मा.विरेंद्रभाऊ जगताप आणि कोषाध्यक्ष श्री. परिक्षीत जगताप यांच्या दूरदृष्टीने आणि कर्तव्यतत्परतेने मला नेहमीच प्रेरीत केले आहे. म्हणूनच यावर्षीचा वार्षिकांक आपल्या स्वाधीन करतांना मला विशेष आनंद होत आहे.या अंकाच्या माध्यमातुन महाविद्यालयातील सृजनात्मकता, कलात्मकता, नाविण्य आणि महाविद्यालयाची सर्वकष प्रगती आपल्या समोर मांडता येत आहे. शिक्षकांकरीता टिचींग मेथेडॉलॉजी, आय.पी.आर. कार्यशाळा,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरीता कार्यालय व व्यवस्थापन कार्यशाळा,विद्यार्थ्यांकरीता आंतर महाविद्यालयीन सेमिनार स्पर्धा आणि अशाप्रकारचे अनेक कार्यक्रम महाविद्यालयाने यशस्वीरीत्या आयोजीत केले या सर्व कार्यक्रमातील विद्यार्थी सहभाग कोरोनाकाळामूळे आभासी असला तरी वाखाणण्याजोगा होता ही बाब मला प्रकर्षाने अधोरेखीत करावासा वाटतो. सोबतच माझे सर्व सहकारी प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी माझ्या नेतृत्वावर विश्वास दाखवुन अशा कठीण परिस्थीतीतही महाविद्यालयाचे कार्य अव्याहत सुरू राहिल याची जबाबदारी घेतली त्याबद्दल मला त्यांचे कौतुक आहेच

शेवटी हा वार्षिकांक प्रत्यक्षरूपात येण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्राध्यापकांचे, प्रकाशकांचे आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो व त्यांना शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

डॉ. सुरेशचंद्र स. ठाकरे
प्राचार्य

संपादकीय...

रसिक वाचकांनो,आपण सर्वांचे आम्ही मनापासून स्वागत करतो. "**संकल्प**" या वार्षिकांकाचे वैशिष्ट म्हणजे नव्या जाणिवेने ते आपल्यापुढे सादर होत आहे.

अनुभव आणि सद्‌विचारांच्या संस्काराने माणसाचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बनतो त्याला नविन जीवनदृष्टी लाभते तिच्यामुळेच मानवी मनाचे उन्नयन होऊन चारित्र्यनिर्मिती होत असते हे कार्य प्रामुख्याने साहित्यिक करीत असते. विचार, भावना आणि कल्पनांचा त्रिवेणी संगम म्हणजेच साहित्य आणि विचाराला परिपक्वता प्राप्त होण्यासाठी महाविद्यालयीन जीवनापासून सुरूवात होणे जरूरीचे आहे.

प्रकृतीपासुन संस्कृतीकडे वळणारा हा मार्ग महाविद्यालयात रूजला जातो म्हणुन विद्यार्थ्यांच्या साहित्यीक गुणांना वाव मिळावा त्यांच्या विचारांनी शब्दरूप धारण करावे, त्यांना लिहीतं कराव हा हेतू समोर ठेवून दरवर्षी आम्ही महाविद्यालयात वार्षिकांकाला प्रकाशित करीत असतो.

महाविद्यालयात सातत्याने वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात तसेच महाविद्यालयात प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणुन सदैव आम्ही प्रोत्साहन देत असतो त्यांनी केलेल्या कामगीरीची नोंद या वार्षिकांकामध्ये घेण्यात येते.

वार्षिकांकाच्या निमित्याने विद्यार्थ्यांनी लिहीलेले लेख, कविता, चारोळ्या, विनोद यांच्या माध्यमातून त्यांच्या वैचारीक सृजनशिलतेचा प्रत्यय येतो.

या वर्षीच्या वार्षिकांकात साहित्याच्या विषयांची विविधता आहे. या अंकाचे श्रेय अर्थातच विद्यार्थी वर्गाला आहे. सदर वार्षिकांक आकर्षक स्वरूपात सादर करतांना आमचा आनंद द्विगुणीत होण्यापेक्षा शतगुणित होत आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

ज्या मनांनी व करांनी आम्हाला सहकार्य केले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत यापुढेही सर्व सहभागी असेच आम्हास सहकार्य करतील अशी अपेक्षा बाळगुण सन २०२०-२१ चा "संकल्प" वार्षिकांक तुमच्या सुपुर्द करतांना मनस्वी आनंद होत आहे.

धन्यवाद !

संपादक मंडळ

डॉ. संघपाल एस. पाढेन
सह संपादक

प्रा. प्रविण डब्लु चौव्हान
सह संपादक

प्रा. कुलदिप सोळंके
सह संपादक

SENIOR COLLEGE FACULTY

DEPARTMENT OF CHEMISTRY

Dr. S. S. Thakare
M.Sc., M.Phil., Ph.D.
Principal

Dr. A. D. Bansod
M.Sc., Ph.D., B.Ed
Head & Assistant Prof.

Dr. S.S. Padhen
M.Sc., NET Ph.D.
Assistant Professor

Dr. A. P. Thakre
M.Sc., NET Ph.D.
Assistant Professor

DEPARTMENT OF BOTANY

Dr. Ms. M. J. Keche
M.Sc., Ph.D., B.Ed.
Head & Assistant Prof.

Dr. S. P. Patharkar
M.Sc., Ph.D.,
Assistant Professor

Mr. P. R. Sardar
M.Sc., NET SET
Assistant Professor

DEPARTMENT OF PHYSICS

Dr. A. P. Pachkawade
M.Sc., Ph.D.
Head & Assistant Prof.

Mr. S. A.Wani
M.Sc., B.Ed.,NET
Assistant Professor

Dr. R. N. Bhagat
M.Sc., Ph.D., B.Ed.
Assistant Professor

SENIOR COLLEGE FACULTY

DEPARTMENT OF ZOOLOGY

Dr. M. P. Chikhale
M.Sc., Ph.D., B.Ed.
Head & Assistant Prof.

Dr. G. B. Santape
M.Sc., Ph.D
Assistant Professor

Mr. A. N. Khan
M.P.ED., NET, N.I.S.
Director of Physical Education

Mr. M.P.Waghmare
M.Lib., M.Phil., NET,SET
Librarian

DEPARTMENT OF MATHEMATICS

Dr. R.V. Kene
M.Sc., M.Phil., Ph.D., B.Ed.
Head & Assistant Prof.

Ms. M. S. Palaspagar
M.Sc., NET SET
Assistant Professor

JUNIOR COLLEGE FACULTY

Ms. S. M. Deshmukh
M.Sc. (Bot.), B.Ed.

Mr. S. S. Thakur
M.Sc. (Chem.), M.Phil., B.Ed.

Mr. P. R. Deshmukh
M.Sc. (Math.), B.Ed.

Mr. M. R. Hande
M.Sc. (Phy.), B.Ed.

Mr. K. K. Solanke
M.A. (English), B.Ed.

Mr. A. M. Patil
M.A.(Eco.) B.Ed., M.Phil., NET

Mr. P. W. Chavhan
M.A.(Marathi) B.Ed.

पुण्यस्मरण

ज्ञानियांचे कल्पतरूला विनम्र श्रध्दांजली...

ग्रामीण भागात विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षण पोहचविण्यासाठी ओढ मनाशी बाळगणाऱ्या अतुल विद्या मंदीर,वर्धा शिक्षण संस्थेचे संथापक पितृतुल्य आदरणीय अन्नासाहेबांशी माझी प्रथम भेट झाली ती त्यांच्याच प्रेरणेतून स्थापन झालेल्या राजर्षी शाहू सायन्स कॉलेजच्या प्राचार्य पदाच्या नेमणूकीची प्रक्रीया सुरू झाल्यानंतर. प्रथम भेटीतच त्यांच्या विद्यापीठस्तरीय शिक्षणाच्या संदर्भातील सखोल ज्ञानाची कल्पना आली. प्राचार्य पदावर रूजू झाल्यापासून प्रत्येक स्तरावर अन्नासाहेबांमधला जाणकार संस्थाध्यक्ष जाणवत होता. एका बाजूला संस्थाध्यक्ष म्हणून ते मला माझ्या प्राचार्य पदाच्या संदर्भात असणाऱ्या त्यांच्या अपेक्षांची जाणिव करून देत होते तर त्याचवेळी अतिशय संयमित शब्दात ते मला प्राचार्य म्हणून माझ्या समोर येणाऱ्या आव्हानांची जाणिव करून देत होते. त्या आव्हानांना सामोरे जातांना ते खंबिरपणे माझ्या पाठीशी असणारच अशी आश्वासकता ही त्यांच्या शब्दांमधून वारंवार व्यक्त होत होती. माझा रूजू अहवाल त्यांनी स्वतः विशेष दक्षता घेवून तयार केला होता. तो तयार करतांना अन्नासाहेबानंमधला एक जाणकार संस्थाचालक जसा जाणवत होता त्याचवेळी वडीलकीच्या नात्याने माझ्या हिताची काळजी त्यांच्या दृष्टीक्षेपात प्रत्यक्ष दिसून येत होती. मी स्वतःला अतिशय भाग्यवान समजतो की, माझ्या प्राचार्यपदाच्या कार्यकाळाची सुरूवात एका जाणकार व्यक्तीमत्वाच्या छत्रछायेत झाली. अण्णासाहेब रोज सायंकाळी महाविद्यालयाच्या प्रांगणात फेरफटका मारायचे व त्या दरम्याण दिवसभर महाविद्यालयात काय काय घडले ते शिपायांकडून मोठ्या बारकाईने जाणून घेत होते. सोबतच महाविद्यालय परिसरातील छोट्या मोठ्या गोष्टी, वृक्षसंपदा इ. वर सुक्ष्म नजर ठेवत असत. जेव्हा कधी या काळात माझी भेट व्हायची तेव्हा मला अल्पसे का होईना मार्गदर्शनाचा लाभ होत होता, मात्र मार्गदर्शन करत असतांना प्राचार्य म्हणून माझ्या कार्यक्षेत्रात कुठेही हस्तक्षेप होणार नाही याची काळजी अन्नासाहेब कटाक्षानी घेत असल्याचे वेळोवेळी जाणवत होते.

अन्नासाहेबांना महाविद्यालयाच्या कार्यालयीन कामाची जशी जाण होती तशीच त्यांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची आस होती. थोर पुरूषांच्या जयंती/पुण्यतिथी साजरी करण्याकरीता आग्रही असायचे व त्या महामनवांचा विचार, कार्य व आदर्श समाजापर्यंत पोहचायला पाहीजे असा त्यांचा मनोमन प्रयत्न होता. महाविद्यालयानी समारात्मक प्रतिसाद देत हे कार्य जोमानी व मोठ्या उत्साहानी निरंतर सुरू ठेवले आहे. 'संकल्प ' हा महाविद्यालयाचा वार्षिकांक अन्नासाहेबांच्याच संकल्पनेतून तयार होत होता त्यामुळे त्याला विशेष दर्जा प्राप्त झाला. राष्ट्रिय सण साजरे करतांना संपुर्ण औपचारीकताचे पालन केले जावे याकडे त्यांचे लक्ष असायचे अंधश्रध्दांना त्यांचा कठोर विरोध होता. खऱ्या अर्थाने अन्नासाहेब विज्ञाननिष्ट होते. माणसांनी दैवावर विश्वास ठेवण्यापेक्षा कर्मावर विश्वास असू द्यावा असे ते वारंवार ठामपणे सांगत व स्वतःच्या आचरणातून ते तसे दाखवून सुध्दा देत. खऱ्या अर्थाने अण्णासाहेबांनी आमच्या छोट्याशा महाविद्यालयाला छानसे वळण लावून विकासाचा मार्ग प्रशस्त करून दिला असेच म्हणावे लागेल. ह्या विज्ञाननिष्ट, अभ्यासू व सुज्ञ महापुरूषाला माझा मानाचा मुजरा करून आदरांजली वाहतो.

.

डॉ. सुरेंद्रचंद्र स. ठाकरे

प्राचार्य

अनुक्रमाणिका

मराठी विभाग

१)	कोविड – १९ एक वैश्विक झंझावात	कु. श्रृतीका ज्ञा. खडके	०१
२)	कोरोनाचा शिक्षणावर झालेला परिणाम	कु. वैष्णवी सु. कदम	०२
३)	कोविड – १९ व प्रतिबंधक उपाय	कु. साक्षी पानतावणे	०३
४)	आयुष्य एक रंगमंच	कु.श्रध्दा सुधीर उके	०४
५)	कोरोनाचे सामाजिक आणि आर्थिक जीवनावरील परिणाम	कु. ऋतुजा अ. निहाटकर	०६
६)	कोरोनामुळे अर्थक्षेत्रात अनर्थ	कु. साक्षी दि. गिरोळकर	०७
७)	कोरोना युध्द व लस	कु. हर्षल अ. मेश्राम	०९
८)	कोरोना एक आवाहन	रोहित जांभुळकर	१०
९)	कोरोना एक वैश्विक महामारी व त्याचे परिणाम	कु. हर्षा र. ढगे	१२
१०)	कोविड– १९ शेतकऱ्यांवर होणारे परिणाम	कु. अनुश्री चौधरी	१३
११)	कोरोनाच थैमानं	कु. दिक्षा भगत	१४
१२)	कोविड – १९ एक वैश्विक झंझावात	कु. अदिती पवार	१६
१३)	वनस्पतींची किमया	डॉ. मिनल जी. केचे	१८
१४)	भलताच कहर	कु. सायली सा. कोठेकर	१९
१५)	कोरोना शी लढा	कु. पूजा ध. बोरकर	२०
१६)	कोरोना काळातील महिलांची व्यथा	कु. आकांक्षा जाधव	२१
१७)	कविता	कु. मयुरी प्र. काहाळे	२१
१८)	अरे अरे माणसा..	कु. साक्षी ग. गवई	२२
१९)	आवरा आता या कोरोनाला	साक्षी दि. गिरोळकर	२२
२०)	कोरोनाची पार्श्वभूमी	कु. हर्षा ढगे	२३
२१)	कोरोनावर मात	कु. लाजरी डी. पकडे	२३
२२)	कोरोना	कु. अंकिता सं. मस्करे	२४
२३)	कोविड – १९ एक वैश्विक झंझावात	कु. दिव्या हरणे	२४

हिंदी विभाग

१)	कष्ट में है वसुंधरा	कु. प्रियंका समरित	२५
२)	कोरोना वायरस	कु. समरिन सदफ	२५
३)	सफर कोरोना के संग	साक्षी ग. सरोदे	२६
४)	कोरोना एक महामारी	कु. पुजा ग. चिरडे	२७
५)	कोरोना एक युध्द	कु. रिंकु कि. डाहाके	२७
६)	कविता	सुरज स. विरूळकर	२८
७)	कोविड–१९ एक वैश्विक झंझावात	दिव्या पां. सडमाके	२८
८)	कोविड से बचो	कु. समिक्षा वि. टोकडे	२९

९)	कोरोना	कु. अंकीता मस्करे	२९
१०)	कोरोना	आफरिन सालेहा कुरेशी	३०

इंग्रजी विभाग

01)	Covid - 19	Snehal Dilip Atak	31
02)	Corona Virus	Shirin Parveen Qureshi	32
03)	Covid-19 One Global Public	Sakshi R. Motwani	33
04)	Corona Virus	Ku. Pooja D. Borkar	34

उर्दू विभाग

०१)	कोराना व्हायरस और हमारी जबाबदारीया	शिरीन परवीन कुरेशी	३५
०२)	कोव्हीड –१९	आफरिन सालेहा कुरेशी	३६

अहवाल

1)	Department of Botany	Dr. Minal J. Keche	41
2)	Department of Chemistry	Dr. A.D. Bansod	44
3)	Department of Physics	Dr. A. P. Pachkawade	46
4)	Department of Zoology	Dr. M. P. Chikhale	48
5)	Department of Mathematics	Dr. R.V. Kene	49
6)	Department of Physical Education	Mr. A. N.Khan	53
7)	Department of Library	Mr. M. P. Waghmare	54
8)	National Multidisciplinary e-conference	Dr. R.V. Kene	55
9)	Gender Equality Cell	Dr. M. P. Chikhale	57
10)	National Science Day	Dr. M. P. Chikhale	59
11)	One Day Online workshop on IPR	Dr. Minal J. Keche	61
12)	Online Induction Program	Miss. M. Palaspagar	63
13)	Internal Complaint Committee	Dr. Minal J. Keche	64
14)	National Service Scheme	Dr. S. S. Padhen	66
15)	Intercollegiate Eassy Wrinting	Dr. S. S. Padhen	71
16)	Arts & Cultural Department	Dr. A.D. Bansod	74
17)	Webinar on Soft Skills	Mr. M. P. Waghmare	76
18)	Webinar on Teaching Methodology	Dr. R.N. Bhagat	77
19)	SIGN*ature*	Dr. G. B. Satape	78
20)	National Webinar on Wildlife Conservation Strategy	Dr. M. P. Chikhale	80
21)	State Level Webinar on Citrus (Orange)	Dr. M. P. Chikhale	82

मराठी विभाग

कोविड - १९ एक वैश्विक झंझावात



कोरोना नंतरच्या कालखंडात आपल्याला आधीच्या जीवनशैली पेक्षा अनेक बदल घडून आलेले दिसतील. आजच्या परिस्थीतीत आपल्याला घरे उंच असलेल्या इमारती एका ठिकाणी एकापेक्षा जास्त लोकांना सामावून घेण्यासाठी डिझाईन केलेल्या आहेत परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव संपल्यानंतर ही उंच इमारती बांधण्याची पध्दत टाळली जाऊ शकते कारण अशा उंच इमारतीमुळे आरोग्य आणि स्वच्छता विचारात घेणारी नव्हती कारण इमारतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीशी संपर्क साधने आवश्यक आहे. लिफ्ट,लिफ्ट बटने,दाराचे हॅन्डल, पृष्टभाग आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शेजारी अशी इमारती बांधण्याची पध्दत असली की इतक्या साऱ्या गोष्टीशी संपर्क येतो. त्यामुळे लोकांच्या मनात असे विचार येतील आपलं मोकळ्या जागेत गर्दी नसलेल घर असावं धार्मिक पुजा वेगळी दिसेल ज्या पुजेला मंदिरात भक्तांची गर्दी दिसायची ती कमी दिसेल आणि पुजा ही मंदिरात न करता ऑनलाईन केल्या जाईल.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे स्वतःला इतरांपासुन कसे दूर ठेवता येईल याची काळजी घेतल्या जाईल त्यामुळे कार्यालयातील अनेक कामे ही घरबसल्या कशी करायची यावर जोर देण्यात येईल.असे लोक असतील ज्यांना कार्यालयात परत जायचेच नाही घरी कामाच्या ठिकाणी असलेल्या व्यवस्थेकडे अधिक लक्ष्य दिले जाईल.लहाणपणी आपल्याला प्रश्न पडायचा की, अस प्रार्थनेला राष्ट्रगीताच्या वेळेस एक हात अंतर दुरच का? पण मला अस वाततयं की कोरोनानंतरच्या काळात या प्रश्नाचे उत्तर सगळ्यांना मिळालेले असेल कारण कोरोना नंतरच्या काळात एक हात दुर रहायच महत्व कळालेल असेल. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे जे कुणी रस्त्यांवर थुंकून घाण करेल त्याला शिक्षा देण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली पण कोरोनाच्या नंतरच्या काळात सरकारला जनतेला सुध्दा पुन्हा पुन्हा सांगाव पण लागणार नाही की रस्त्यांवर किंवा कुठेही थुंकू नये कारण कोरोना हा विषाणु गेल्यानंतर ती आपली सवय बनून जाईल आणि त्यामुळे आपल्या देशातील सरकारच्या स्वच्छता अभियानाला प्रतिसाद मिळेल.

चला तर कोरोना विषाणूच्या निमित्ताने का होईना आपल्याला आपल्या भारतीय संस्कृतीची आठवण झाली भारतीय संस्कृतीतील अनेक गोष्टींचे जर आपण व्यवस्थित रित्या आचरण केले तर भविष्य काळात येणाऱ्या अशा अनेक विषाणूंवर आपण मात करू शकतो. मागील ११ महिन्यांपासून आपणासर्वांना कोरोना विषाणुमेळे होणाऱ्या कोविड-१९ या आजाराने भयभूत करून सोडले आहे. जस प्रत्येक नाण्याला जशा दोन बाजू असतात त्याचप्रमाणे माझ्या दृष्टीने या कोरोना विषाणुने मात्र जगातील सर्व मनुष्यजातीला प्रचंड शिक्षा आणि शिकवण व बऱ्याच गोष्टीची आठवण करून दिली आहे. ह्या कोरोना विषाणुमुळे आपली भारतय संस्कृती किती थोर आणि महान आहे आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे हा कोरोना आपणास बाहेरून घरात आल्यानंतर हात आणि पाय स्वच्छ ठेवायला भाग पाडतो जेव्हा दोन व्यक्ती भेटतात तेव्हा त्यांना दोन्ही हात जोडून नमन करण्यासाठी नमस्कार करण्यास भाग पाडत आहे. दोन्ही व्यक्तीमध्ये संभाषण चालू असतांना एक मिटरचे सुरक्षित अंतर ठेवण्यास भाग पाडत आहे घरातील आणि परिसरातील स्वच्छतेचे महत्व पटवून दिले आहे. आपल्याला निरोगी राहण्यासाठी उत्तम आचरण स्वच्छता,सवयी, शिस्त या गोष्टींच्या हिशोबाचा ताळमेळ ठेवण्यास कोविड-१९ भाग पाडते आहे.



कु. श्रृतीका ज्ञा. खडके
(बी.एस्सी. भाग ३)

*****

कोरोनाचा शिक्षणावर झालेला परिणाम



माणसाच्या मूलभूत गरजांपैकी शिक्षण ही एक मूलभूत गरज आहे. २१ व्या शतकात शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. कोरोना विषाणूचा सर्वात जास्त परिणाम याच शिक्षण क्षेत्रांवर झालेला पहायला मिळतो त्या अनुषंगाने राज्य शासनाकडून शाळा बंद पण शिक्षण सुरू ही मोहिम हाती घेण्यात आली ज्या अंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देण्याचे धोरण आखण्यात आले.

मुलांचे लक्ष एकाच गोष्टीकडे गुंतवणे ही महाकठीण गोष्ट निदान शाळेत मित्र,शिक्षण,शाळेचे वातावरण या कारणांमुळे तरी मुले काही प्रमाणात का होईना अभ्यासकडे लक्ष देतात. घरात मात्र या सर्व वातावरणाचा अभाव असल्याने 'घरून शिक्षण' वर्क फ्रॉम होम या संकल्पनेच काय होईल ती यशस्वी ठरेल का,अशा शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

लहान मुलांना एखादी गोष्ट करण्यापासून जेवढे तुम्ही रोखाल तेवढे ते आणखी हट्टाने तीच कृती करतात. मोबाईलचेच उदाहरण घ्या ना मोबाईल घेऊ नको असं. कितीही बजावून सांगीतले तरी ते या ना त्या कारणाने मोबाईल डोळ्यासमोर धरतातच याला सध्याच्या परिभाषेत 'स्क्रीन टाईम' असे म्हटले जाते. स्मार्टफोन आणि स्क्रीन यांच्यापासुन लहान मुलांना फार काळ दूर ठेवणे शक्य होत नाही टाळेबंदीमुळे घरात अडकून पडलेल्या लहानग्यांना या स्क्रीन टाइमापासून कसं भरकटवायचे हा मोठा प्रश्न पालकांसमोर उभा आहे. कोविड-१९ साथ आणि त्यानंतर लावण्यात आलेला लॉकडाऊन यामुळे देशभरातील शाळा बंद झाल्या आहेत. परिणामी भारतातील शाळा व्यवस्था पारंपारिक वर्गांमधुन डिजीटल प्लॅटफॉर्मवर स्थलांतरीत झाली आहे.

ऑनलाईन शिक्षणाच्या दिशेने घाईत उचलल्या गेलेल्या या अनियोजित पावलांमुळे 'डिजीटल उपलब्धता' नसलेला एक मोठा वर्ग या आभासी वर्गाबाहेर फेकला गेला आहे.ऑनलाईन शिक्षण मुठभर सुदैवी मुलांनाच मिळत आहे. कारण भारतातील केवळ २४ टक्के कुटूंबाकडे स्मार्टफोन्स आहेत ५ ते १८ वयोगटातील मुले असलेल्या केवळ ११.५ टक्के घरांमध्ये कम्प्युटर आणि इंटरनेट कनेक्शन आहे. मात्र या सर्वांचे आयुष्य एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून घरापुरते संकुचित झाले आहे. लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढणे म्हणजे परीक्षा पुढे ढकलणे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेणे होय. कष्टकरी जनतेची मुले डोळ्यासमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाजघटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालु राहील याची योजना केंद्र व राज्य सरकारने तातडीने करावी.

कोरोना विषाणुची साथ हे दुयऱ्या महायुध्दानंतरचे जगासमोरचे मोठे संकट आहे. मानवी जीवनाच्या सर्वच बाजुवर या संकटाने प्रभाव टाकला आहे या रोगाला अजून प्रतिजैविके न सापडल्यामुळे रोग होऊ नये म्हणुन प्रतिबंधक उपाय योजणे एवढाच आता सर्वांसमोर पर्याय आहे म्हणुन लॉकडाऊनचे धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा सर्व देशांत प्रयत्न चालु आहे.

कोरोनामुळे सध्या सगळ्यांचच आयुष्य अस्थिर झालयं हळूहळू औषध मिळू लागण्याच्या बातम्या येत आहेत मात्र ही संकटपूर्णपणे जाईल याची अजून तरी शाश्वती मिळालेली नाही त्यामुळे सामान्य पणे जगण्यासारखे निर्बंध कायम आहेत यातून बाहेर पडण्यासाठी काही उपायांचा सध्या अवलंब करावा लागेल. हे सगळं कधी संपणार ? आपलं आयुष्य पुर्वपदावर कधी येणार? या प्रश्नांची तुम्हा-आम्हालांच नव्हे तर जगातल्या प्रत्येकाला ग्रासून टाकलयं.



कु. वैष्णवी सु. कदम
(बी.एस्सी. भाग ३)

कोविड - १९ एक वैश्विक झंझावात

जगामध्ये मनुष्याने अनेक रोगांचा सामना केला आहे. पण आज संपूर्ण जगभरात एका अशा व्हायरसने थैमान घातलंय कि, ज्यामुळे संपूर्ण जगाची झोपच उडाली आहे. लोकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.ज्यामुळे सर्वांचे जीवन जगणे कठीण बनले आहे. तो रोग म्हणजे कोवीड-१९ एक वैश्विक महामारी संपूर्ण जगभरात सध्या कोरोनाचा कहर सुरू आहे जगभरातील लाखो लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. या विषाणूने कित्येक जणांचा बळी घेतला सर्वांत पहिले कोरोना चीनमधील वूहान शहरामध्ये सापडला नंतर संपूर्ण जगभरात हा पसरला.

कोरोना श्वसन प्रकियेतुन होतो एकापासुन दुसरा दुसऱ्यापासून तिसरा असा हा पसरतच जातो जर आपल्याला कोरोना झाला तर लवकर समजत पण नाही कारण याची लक्षणे अगदी सामान्य आहेत म्हणजे ताप,थकवा आणि कोरडा खोकला किंवा काही रूग्णांना वेदना,अनुनासिक रक्तसंचय वाहणारे नाक,घसा खवखवणे होऊ शकतो ही लक्षणे सहसा सौम्य असतात आणि हळूहळू सुरू होतात. काही लोकांना संसर्ग होतो पण त्यांच्यात कोणतीही लक्षणे दिसत नाही काही व्यक्ती गंभीर आजारी पडतात आणि त्यांना श्वास घेण्यास त्रास होतो. वृध्द लोक आणि उच्च रक्तदाब,हृदयरोग किंवा मधुमेह यासारख्या मूलभूत वैद्यकीय समस्या असलेल्या लोकांना गंभीर आजार होण्याची शक्यता आहे. इतिहासाने आपल्याला सांगीतले आहे की प्रत्येक १०० वर्षांनी कोणती न कोणती महामारी येणारच

यापासून आपल्याला वाचायचे असेल तर आपण पुढील नियम पाळूया

- नेहमी आपले हात स्वच्छ धुवायचे
- चेहऱ्यावर नेहेमी नेहमी हात लावायचे नाही
- इतरांपासून ५ ते ६ फूट अंतर ठेवायचे
- अति आवश्यक असेल तेव्हाच बाहेर जायचे
- सार्वजनिक जागा म्हणजे मॉल,बाजार या जागेंवर नाही जायचे
- महत्वाच म्हणजे बाहेर गेलं तर चेहऱ्याला मास्क लावायच
- या छोट्या छोट्या गोष्टींवर आपण नियम पाळले तर नक्कीच वाचू शकतो

परंतु आपल्याला कोरोना असलेल्या रुग्णासोबत नाही लढायचे आहे तर कोरोना या रोगाला झुंज द्यायची आहे या प्रचंड मोठ्या संकटातून निघायचे आहे या कोरोनाला नष्ट करायचे आहे. आपण सर्वांनी एकमेकांना सहकार्य केलं आणि नियम पाळले तर या संकटातून नक्कीच बाहेर पडू.

कु. साक्षी पानतावणे
(बी.एस्सी. भाग ३)

आयुष्य एक रंगमंच

आयुष्याच्या रंगमंचावर आज २०२० येऊन ठेपला आयुष्याच्या वळणावर आज २०२० ही पाहून घेतला बघता बघता जानेवारी,फेब्रुवारी पण गेला आणि आला होता मार्च १५ मार्च फार कठीण दिवस होता पूर्ण भारतच नव्हे तर पूर्ण जग शांत झाला घरी राहा,सुरक्षित रहा बस इतकचं ऐकुण दिवस गेला.

अहो! श्रीमंताच सोडा हो, पण आमच्या गरीबाचे मोठे हालच झाले शरिरात उर्जा होती,पंखात बळ होते, पण तरी आम्ही पिंजऱ्यात अडखलो होतो परिस्थीती मोठी बेताची होती पण मनात भिती होती म्हणून थांबायची हिम्मत केली माणसाची जात मोठी खराब मरणाची इच्छा तर नसते पण परिस्थीती मात्र मरायला भाग पाडते

त्या काळात समजलं, की आपण प्राणी,पक्षीयांना डाबून ठेवत होतो आणि आज परिस्थीतीने आपल्याला डामले होते इथे आपले कर्म आपल्यासोबत खेळले रोजचा दिनक्रम चालू झाला उठा,खा,प्या आणि झोपा, आपण झोपलो चिंता न करता पण आपला बाप मात्र होते चिंतेत बाप आहे तो, खांद्यावर ओझे आहे, जबाबदारी आहे कुटूंबाची या काळात नकळतपणे बापाचे कष्ट दिसून आले तस कधी ते दाखवत नाही पण या काळात ते बघितले.

उपासमारीने लोक मेले ना प्यायला पाणी,ना जायला वाहने,ना रहायला घर होते तो फक्त प्रवास,सुखाचा नाही अति दुःखाचा गर्भवती भगीनीच्या व्यथा फक्त प्रवास,सुखाचा नाही अति दुःखाचा गर्भवती भगीनीच्या व्यथा फक्त तिला माहित असते सुखाचा क्षण तिला पाहिजे पण हे २०२० होते इथे तिला पण दुःखच दिले काळही चांगला नाही आणि ऋतु ही चांगला नव्हता तर तो उन्हाळा,रूद्र अवतार घेतलेल्या या सुर्याखाली मैलो मैल जाणारे आपले बहीण भाऊ फक्त चालत होते ते काटयाच्या गादीवर प्रवास होता तो फक्त आणि फक्त त्रासाचा

चला, आपले दुःख सांगता सांगता संपणार नाही.

पण या काळात (covid-19) च्या महामारीमध्ये आपल्या पाठी खंबीरपणे उभे होते ते, पोलीस, डॉक्टर, परिचारीका /परिचारक, रूग्णवाहीका चालक आणि एकाला विसरू शकत नाही ते म्हणजे स्मशानभुमीतील कर्मचारी दिवसाला दहा पेक्षा जास्त प्रेत जाळले म्हणजे काळजावर दगड ठेऊन आणि आपल्यासाठी त्याच्या आयुष्याला मरणाच्या दारात उभे करणे काही सोपे काम नाही.

पोलीस :- देवमाणूस २४,२४ तास आपले कर्तव्य बजावत होते त्याचेही फार हाल झाले. वर्दीत जणू देव उभा असल्यासारखा रस्त्यावर रात्र-दिवस आपल्यासाठी कार्यरत होते. आपल्या संरक्षणासाठी पार त्यांच्या सुखाची धुंड माती केली.आणि आज ही देवमाणुस खंबीरपणे उभा आहे ना त्याला वादळाची भिती ना उनाची ना कशाचीच असो आपले पोलीस काका पांडू नाही पांडुरंग म्हणून उभे आहे. डॉक्टर,परिचारीका/परिचारक,रूग्णवाहिनी चालक आणि स्मशानभुमीतील कर्मचारी वर्ग या लोकांचे तर आभार मानावे तेवढे कमी

डॉक्टर :- तुला कोरोना झाला आता कोणी जवळ येऊ शकत नाही आणि जवळ आला तर त्यालाही कोराना होणार असा हा संसर्गजन्य रोग पण त्याला ही न घाबरता डॉक्टर आणि कर्मचारी वर्ग तुमच्याजवळ येऊन तुमची काळजी घेत होते देव आहे की नाही

माहित नाही पण माणसातला देव मात्र या काळात दिसला आणि अनुभवले सुध्दा मरणाच्या दारातुन वापस आणण्याचे धाडस (दम) त्याच्या मनगटात आहे आणि कोणत्याही परिस्थीतीतील ते शेवटव्या क्षणापर्यंत आपली शक्ती/अनुभव लावत या पूर्ण कोविड च्या काळात कोणाच्या आईला, बाबांना, आत्या, मावशी, काका, काकू आजी-आजोबा मामा-मामी, भाऊ बहीण तर कोणाच्या दोन चार महिन्याच्या लेकराला वाचवण्याचे धाडस त्यांच्यात होते म्हणून आज ते सन्मानास्पद आहे.

रूग्णवाहीणी चालक :- तुमची पण कमालच ना कुठून इतक बळ येते हो ! की ऐका तासातच नव्हे तर अवघ्या काही मिनटात या शहरांतुन त्या शहरात घेऊन जाता (रोजच्या प्रवासात जिथे जायला २ तास लागतात) आणि तेही तुमच्या जीवाची परवा न करता, पाच मिनटात जर जीव वाचणार असणार तर तो माणूस त्याला २ मिनटात पोहचवतो किती बोलु तुमच्या बद्दल तुम्ही तर खरे नायक आहात.

स्मशानभुमीतील कर्मचारी :- या कोविड च्या काळात यांचे उपकार फेडावे तितके कमी जन्म आईच्या उदरातून होतो आणि मरण हे या धरती मातेच्या उदरात येतांना जातांना येतांना येतो तो एकटाच आणि जातांना जातो ही एकटाच पण त्याच्या या शेवटच्या प्रवासात साथ असते ते आपल्या माणसाची पण या काळात तर नेहमी जमले नाही आईपासुन वासरू दुर गेलं आणि बापाचा आधार (मगं ती मुलगी असो की मुलगा) भाऊ-बहीण नवरा-बायको, मित्र-मैत्रिणी,मित्र-मित्र,प्रियकर-प्रियसी,कधी कोणाचे बाबा तर कधी आई पण शेवटच्या क्षणाला मात्र तू दिलास साथ खांदा नाही देऊ शकला कोणी पण तू होतास शेवटच्या प्रवासात शेवटची अग्नी तुझ्या हातुन दिल्या गेली आणि तू दिलीस देखील तुढे आपुलकीचे नाते समजून धन्यवाद मानावे तेवढे कमीच असा हा कोविड - १९ वैश्विक महामारी झंझावात आहे.

अंगाला शहारा येणार असे थरारक भुतकाळ आपण पाहिले आणि वर्तमान आणि भविष्यकाळ पाहूच हेच आपले ध्येय आणि यासाठी सर्वांना शक्ती,बुध्दी,हिम्मत,आधार द्यावा हिच देवा तुझ्याकडे मागनी.

आज आहोत,उद्या नाही,
भविष्य काही पाहलं नाही,
वर्तमान चिंतेत नाही,हसतं जगायच
आणि दुसऱ्यांना सुध्दा हसायला शिकवायचं!

कु.श्रध्दा सुधीर उके
(बी.एस्सी. भाग २)

कोरोनाचे सामाजिक आणि आर्थिक जीवनावरील परिणाम

'' भौतिक सुखात अडकलेल्यांना जिवनाकडे पाहायला शिकवलं
शहरामध्ये डोलणाऱ्यांना मातीत रहायला ! शिकवलं
कोरोना तू खरंच माणसाला जगायला शिकवलं ''

इतिहासामध्ये आपल्याला मधलं अपत्य असं म्हटलं जाते हे बोलन पण असू शकते, आपण आपल्या आयुष्यात नाही महायुध्दे पाहली आहेत,ना ही जागतिक महामंदी पाहली आणि ना ही आपल्या डोक्यावर आकाशातुन बॉम्ब पडले आहेत त्यामुळे आपल्या पिढीला 'कंटाळवाणी पिढी' असं म्हटलं जाते, पण हाच संवाद लेखक आता जर कोणाला भेटला ना तर लोक ६ फुट लांबीची काठी घेऊन सामाजिक अंतर पाळून त्याला बदाडून काढतील कारण 'कोरोना' इतिहासाने न अनुभवलेली परिस्थीती आज तुम्ही आम्ही जगतोय आपल्या जगण्या वागण्याचे सगळे संदर्भच बदलून गेले आहे यातील काही बदल तात्पुरता जरी असला तरी काही बदल आपल्या जीवनावर दुरगामी परिणाम करून जाईल हे नक्की....

''पारावरची चर्चा आता । बंदच पडलीया गावात
सोन्यावाणी पिक शेतकऱ्यांच । जातय कवडीमोलातं
हाती आलेल्या पिकाला । कसा लागलयं नाट
गजबजलेल्या लोकांत एकटी । पडली आहे हो वाट...''

वरील ओवी सांगतात की काय आहे आजची परिस्थीती तर आता बघुया की या कोरोनाने कोणकोणत्या क्षेत्रात बदल घडवून आणलेले आहे, पहिलं म्हणजे अर्थव्यवस्था, आपली आजची अर्थव्यवस्था तीन गोष्टीवर आधारित आहे, पहिलं म्हणजे उत्पादकता,दुसरं वेतन आणि तिसरं पुरवठा साखळी या तीन गोष्टीवर आपली आताची अर्थव्यवस्था अवलंबुन आहे आणि याचीच तुलना करतांना अर्थतज्ञ जेम्स मिडवे म्हणतात की, आता आपण जशी अर्थव्यवस्था की ते लोकांच्या उपजिवीकेवर परिणाम न करता उत्पादन शक्य तितकं कमी करू शकेल आणि याचच फायदा म्हणून येत्या काळात भारत आणि मॅक्सिको सारख्या आता विकसनशिल अर्थव्यवस्था येत्या काळात महासत्ता म्हणून पुढे येतील...

दुसरं म्हणजे पर्यावरण कोरोनाकाळातील पुर्णबंदीमुळे अन्न आणि वस्तु वाया घालवण्याच्या मानवाचा स्वभाव कमी गोष्टीवर नियंत्रण आले.

तिसरं म्हणजे नातेसंबंध, कोरोना काळात घरात अडकलेल्या कींवा बाललैंगिक शोषणाच्या शिकार झालेल्या लोकांचे आयुष्य पुर्णपणे बदलुन जाईल याचा समाजावर फार वाईट परिणाम होईल हे चित्र आशादायक नाही आहे, मान्य आहे,पण या कोरोनाविषाणूच्या साथीने जर एक गोष्ट सिध्द केली असेल तर हे म्हणजे की मानव निर्मित यंत्रणा जरी बंद पडल्या तरी माणुस हा मानसाला तारूण नेऊ शेकतो, त्यामुळे पुढचं जग वाचवणं नक्कीच आपल्या हाती असेल.

*****

कु. ऋतुजा अ. निहाटकर
(बी.एस्सी. भाग ३)

कोरोनामुळे अर्थक्षेत्रात अनर्थ

कोविड -१९ अर्थात कोरोना विषाणुच्या प्रसाराचा भारतासह संपूर्ण जगातील प्रत्येक घटकांवर अत्यंत खोलवर परिणाम झालेला आहे. हे सार पाहुण १९६३ साली अल्फ्रेड हिचकांक याची उत्कृष्ट निर्मिती असलेल्या 'बर्डस' या चित्रपटाची निर्मिती आठवण झाल्याशिवाय राहत नाही. या चित्रपटात अशीच काळजी,चिंता आणि भयावह अनुभवाची आठवण होते सतत होणाऱ्या पक्ष्यांच्या हल्ल्यानंतर बोदेगा बेटावर संपुर्ण लॉकडाऊन करण्यात आले होते. सगळीकडे दहशतीचे वातावरण होते. रस्ते निर्मनुष्य झाले होते सगळं काही ठप्प झाले होते या पुढे काय होणार ? या चिंतेन सर्वांनाच ग्रासले होते मात्र या वेळेस चिंता, काळजी,भीती आणि लॉकडाऊन यामध्ये साम्य दिसुन येते. सर्व परिस्थीती सारखीच आहे.

आता या परिस्थीतीमुळे भारतासह जगभरातील अनेक भागात माणसांच्या हालचाली साधन सामग्री आणि वाहतुक आदि सर्वच क्षेत्रांना एकप्रकारे लकवाच मारला आहे. सगळे ठप्प झालेय सेवा क्षेत्रातील लहान उद्योग 'वर्क फ्रॉम होम' च्या माध्यमातुन हे नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न करत आहेत. उत्पादन क्षेत्रे,लॉजिस्टीक्स, वस्तु व सेवा क्षेत्रातील अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होऊ शकतो हे समजुण घेणे महत्वाचे आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

पुढील ५-६ आणि त्यानंतर भारतीय आर्थिक विकास दरावर काय परिणाम होतील याचा अंदाज लावणे सध्याच्या घडीला तरी कठीण आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही अभ्यासाकरीता देशांतर्गत असलेल्या त्याचबरोबर आंतरदेशीय क्षेत्रावर अवलंबुन असलेल्या डेटाची आवश्यकता असेल.आजचे संकट यापुढील काळात मर्यादीत राहणार नाही, कारण हे तेव्हा होतं जेव्हा एकटा चीनला या संकटाने घेरले होते.

'आज या महासंकटाने जगातील एक मोठा भाग व्यापला आहे आणि व्यापाराचा मार्ग पुर्णपणे थोपावुन धरला आहे याशिवाय कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागु केलेल्या लॉकडाऊनमुळे देशांतर्गत क्षेत्रावर अवलंबुन असलेले उद्योग ठप्प झाले आहेत. लॉकडाऊनच्या अल्पकालीन आणि मध्यम कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करणाऱ्या किंवा अडथळा ठरणाऱ्या संभाव्य घटकांचा विचार केला तरी,जगभरातील अर्थक्षेत्रातील अनर्थ स्पष्ट दिसतो.'

'लॉकडाऊच्या कालावधी वाढल्याने भारतातील सर्वात मोठ्या सेवा क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्या आणि मागणी घटली तर उत्पादन क्षेत्राला मोठा फटका बसेल रोजचे पुरवठा आणि मागणीत कोणतेही बदल झालेले नाहीत पण आलेले संकट आणि त्याच्या संभाव्य वाढीच्या शक्यतेमुळे गुंतवणुकीच्या निर्णयातील आत्मविश्वास नाही तसेच दैनंदिन कामकाजामधील आत्मविश्वासही कमी झाला आहे. जोपर्यत स्वीकाहार्य तोडगा किंवा आत्मविश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठीचे उपाय शोधले जात नाहीत, तोपर्यत मंदिचा काळ सुरूच राहील.'

या संकटाने अर्थव्यवस्थेचे असलेले मूलच अस्ताव्यस्त करून टाकले आहे. म्हणून त्याची बांधणी किंवा पुर्नबांधणी

करण्यासाठी अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे आणि केवळ ते दिर्घकालानंतरच शक्य आहे या कोरोनामुळे शिक्षण पध्दतीमध्ये पण खुप बदल झाला,आता संपुर्ण शिक्षण पध्दतीमध्ये पण खुपबदल झाला आता संपुर्ण शिक्षण पध्दती ऑनलाईन पध्दतीमुळे आला आहे या पध्दतीमुळे सर्व विद्यार्थ्यांना परेशानी होत आहे. या मुळे सर्व विदयार्थ्यांच्या भविष्यमध्ये खुप बदल होत आहे त्यांचे डोळ्यांवर परिणाम होत आहे व त्यांची विचार करण्याची क्षमता कमी होत आहे व तसेच या भारतात असे कित्येक विद्यार्थी आहेत ज्यांच्याकडे मोबाईल फोनची पण सुविधा नाही त्यांच्या शिक्षणामध्ये तर खुप अडचणी होत आहेत.

या कोरोना व्हायरसमुळे तर सर्वांची आर्थिक परिस्थीती मध्ये बदल झाला आहे परंतु या बिकट परिस्थीतीमध्ये पण आपण हार मानायची नाही.

*****





कु. साक्षी दि. गिरोळकर

(बी.एस्सी. भाग २)

कोरोना युध्द व लस

भविष्य उदरात गडप झाल्याचा आभास झालेल्या महामारीच्या काळात जनजीवन अस्ताव्यस्त अन उद्ध्वस्त झाले. आता काय होणार ? असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात निर्माण झाला होता. महामारी कधी संपुष्टात येईल हे नेमके कोणालाही सांगता येत नव्हते मात्र वैज्ञानिकांच्या अभूतपूर्व प्रयत्नानंतर कोरोना संसर्गावर 'लस' शोधण्यात अखेर यश आले याकरीता रात्रीचा दिवस करणाऱ्या समस्त वैज्ञानिकांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे कारण लोकांना दुःखदायी जीवन वाट्याला येऊ नये यासाठी किमान सातत्याने प्रगतीची शिखरे गाठत असते कारण प्रत्येकाला विज्ञानाचाच आधार आहे.

विज्ञान नसते तर महामारीलाही अधर्माचे रूप आले असते. मात्र धर्म आणि अधर्म महामारी बघत नाही. महामारी केवळ लोकांच्या आयुष्यात सुरूंग पेरणाऱ्याचीच पाठराखण करू शकते. माणूस निसर्गावर विजय मिळवू शकत नाही, पण माणसाचा बळी जाणाऱ्या रोंगांवर विज्ञान योग्य उपचार करण्यासाठी सक्षम,अशी यंत्रणा उभारू शकते त्यामुळे काल,आज आणि उद्याही विज्ञानच तारणहार ठरणार आहे. भारतात सीरम आणि ऑक्सफोर्डने तयार केलेल्या 'कोविशिल्ड' आणि भारत बायोटेक कंपनीने तयार केलेल्या 'कोव्हॅक्सीन' या दोन्ही लसींना आपातकालीन वापरासाठी परवानगी देण्यात आली आहे लोकांची वर्षभराची प्रतिक्षा आता फळाला आली आहे. मात्र, ज्या लसीच्या प्रतीक्षेत प्रत्येकाचा जीव अडकला होता त्या लसीवरून आता राजकारण पेटले आहे नोव्हेंबर २०२० पासून लसीकरणाऱ्या विरूध्द चुकीची माहिती पसरण्यास सुरूवात झाली पण हे काय पहिल्यांदाच घडत नाही. याआधी ही अनेक रोगांवर जेव्हा पहिली लस आली तेव्हा सुध्दा वेगवेगळ्या प्रकारची चुकीची माहिती पसरवण्यात आली होती

ऑक्सफोर्डच्या लसींबद्दल सप्टेंबरच्या सुरूवातीला रशियन मिडीयामध्ये काही बातम्याही आल्या होत्या. ऑक्सफोर्डची लस बनवतांना वापरलेल्या तंत्रज्ञानामुळे जर ही लस घेतली तर घेणाऱ्याचे माकडांत रूपांतर होईल अशीही अफवा पसरली काही दिवसांपूर्वी ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांनीसुध्दा लस घेतल्यावर नागरीक मगरींमध्ये रूपांतरीत होतील असे वक्तव्य केले. सध्या भारतात सुध्दा लस घेतल्यावर एडस् होईल किंवा लोक नपुंसक होतील तसेच काही डॉक्टरांना वाटतेय की, लस दिल्यावर त्यांनाच कोरोना होईल,अशा प्रकारचे आजार होत नाहीत काही वेळा शास्त्रज्ञसुध्दा खोटी माहीती पसरवतात आणि स्वतःच्या फायद्यासाठी त्याचा

वापर करतात परंतु ही लस वापर करण्याची वस्तु नसुन तर कोरोना लसींशी अनेकांच्या भावना जुळलेल्या आहेत. ज्यांना आपल्याच स्वतःच्या माणसाच्या मृतदेहापासून अंतर राखावे लागले. ज्यांना आपले आई-वडील,भाऊ-बहिणीला गमवावे लागले, त्यांना ही लस अंतरात्म्याचा आवाज असू शकते.

कु. हर्षल अ. मेश्राम
(बी.एस्सी. भाग ३)

कोरोना एक आव्हान

जानेवारी २०२० मधील नवीन वर्षाचा पहिला महिना ,नविन वर्ष नुकतेच सुरू झाले होते. सगळ्यांना अपेक्षा होत्या सगळ्यांना वाटत होते कि नविन वर्ष सुख समृध्दीचे जावो जेव्हा सगळीकडे नवीन वर्षाचा आनंद लोक व्यक्त करत होते तेव्हा दुसरीकडे कोरोनाने भारतात पाय ठेवला कुणालाच माहिती नव्हते कि हे नविन वर्षे एक संकट घेऊन येणारे होते.

कोरोनाने भारतात पाय ठेवला आणि बघता बघता त्याचा फैलाव होऊ लागला आणि पाहताच तो सगळीकडे पसरू लागला भारतात कोरोना पेशंटची संख्या हळुहळु वाढू लागली जिथे दुसरीकडे विदेशात कोरोनाने कहर घातलेला होता लाखो लोक कोरोनामुळे मरण पावत होते कित्येक देशांच्या अर्थव्यवस्था,सामाजिक व्यवस्था बिघडत चालल्या होत्या अशा परिस्थीतीत भारतात कोरोनाचा स्थर नियंत्रित होता.

बाकी देशांसारखे हाल भारताचेही होऊ नये म्हणून त्यावर उपाय म्हणून भारत सरकारने लवकरच लॉकडाऊनचे आदेश दिले आणि मार्च २०२० ला लॉकडाऊनला सुरूवात झाली. सगळीकडे लॉकडाऊनचे वातावरण होते पण तरीही पेशंटची संख्या झपाट्याने वाढत चालली होती अशात सरकारने वेळोवेळी नवनविन आदेश देण्यास सुरूवात केली आणि लोकांना कडकडून आदेश देण्यास सुरूवात केली आणि लोकांना कडकडून आदेशांचे पालन करण्यास बजावले प्रत्येक व्यक्तीला मास्क बंधनकारक केले, गरजेच्या वस्तू सोडुन सर्व दुकाने बंद ठेवण्यास सांगितले

कामाशिवाय घराबाहेर पडु नये असे सांगीतले. तर दुसरीकडे कोरोना व्हायरसवर लस शोधण्यासाठी संपूर्ण वैज्ञानिक प्रयत्न करत होते आणि करत आहेत पण आजापर्यंत खूप व्हॅक्सीन तयार केल्या आहेत पण कधी ना कधी काही ना काही कमी त्यात राहायचीच म्हणून व्हॅक्सीन बनवण्यात यश येत नव्हते.

या कोरोना व्हायरसने लोकांना भितीची जाणीव करून दिली आहे. देवाने दिलेल्या या आयुष्यात कसे जगावे हे सांगितले आहे. धर्म आणि जातीवर कित्येक वर्षे भांडणे आणि दंगे होत असते पण या कोरोनाने लोकांना शियकविले आहे की माणसाची फक्त एकच जात आहे आणि ती म्हणजे माणुसकी आणि ती जपली की जगणे खूप सोपे होते.कितीतरी लोकांनी या कोरोनाच्या काळात लोकांना मदत केली आहे. त्यांची जात, धर्म न पाहता त्यांना मदत केली आहे. आणि हेच आपण विसरलो होतो जे कोरोनामुळे पुन्हा आठवले आहे.देवाने बनविलेल्या या जगात कसे वावरावे,कसे जगावे हे लोक विसरले होते या कोरोना व्हायरसने त्यांना सांगितले की जेव्हा प्रकृती उत्तर देण्यावर येते तेव्हा खूप भोगावे लागते.जसे मनात येईल तसे जगावे, कुठेही काहीही करावे, कुठेही कचरा टाकावा, कुठेही थुंकावे, वाढते प्रदुषण इत्यादी अनेक कारणांमुळे मानव प्रदुषणास कारणीभूत ठरत आला आहे. पण या कोरोनाच्या लॉकडाऊनमुळे संपूर्ण लोक घरात होते त्यामुळे प्रदुषण फार कमी झाले आहे. वातावरण आणि निसर्ग खुलून उठला आहे. पर्यावरण स्वच्छ झाले आहे.

WHO (World Health Organization) ते कोरोना व्हायरसला महामारी घोषित केले आहे. कोरोना व्हायरसला महामारी म्हणजे असा रोग जो सामान्य अपेक्षांपेक्षा जास्त अपेक्षादायक,व्यापक आणि घातक असतो जो जास्त काळ

राहतो. महामारी ही कोणत्याही एका जागेवर जास्त राहत नाही ती एका जागेवरून दुसऱ्या जागेवर (एका देशातुन दुसऱ्या देशात) फैलत राहते आणि कोरोना व्हायरसचा प्रकोपदेखील असाच आहे. त्यामुळे ने WHO कोरोना व्हायरसला महामारी घोषित केले आहे. पण हे पहिल्यांदाच झाले असे नाही.भारतात १९०० च्या दशकांपासुन महामारीचा फैलाव आहे. पण कोरोना व्हायरससारखी व्यापक आणि जास्त काळ राहणारी महामारी पहिल्यांदाच आली आहे.

या जगात मानवाला कित्येक वेळा अनेक वेळा अनेक महामारीचा सामना करावा लागला आहे आणि सध्यादेखिल संपूर्ण जगाला एका अशाच व्हायरसने त्रस्त केले आहे ज्यांच सध्या फक्त नाव ऐकल्यावरच लोकांच्या मनात भितीच वातावरण तयार होत आहे. या व्हायरसने लोकांपासुन खूप काही हरविले आहे आणि खूप काही शिकविले आहे.या महामारीमुळे लोक ऑनलाईन शिक्षणाकडे वळले आहे. ऑनलाईन शिक्षण घेण्यास नाईलाजस्तव केले आहे. आतापर्यंत ज्यांना ऑनलाईन शिकणे माहित नव्हते ते सर्व आज ऑनलाईन पध्दतीने शिकत व शिकवत आहे.लोक घरबसल्या ऑफीसची कामे करत आहे घरबसल्या लोक Report, Project, Seminar, Presentation तयार करीत आहे आणि ऑनलाईन पध्दतीनेच Present करीत आहेत. सगळीकडे काहीकाळ एकदम ठप्प वातावरण होते. बस,ऑटो बंद होते जी रेल्वे भारत स्वतंत्र झाल्यापासुन कधीही बंद नव्हती ती या महामारीमुळे गेल्या ३-४ महिने बंद होती त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था ढासळली आहे.कोरोना व्हायरस जीथे एकीकडे त्याचा प्रकोप शांत झाला आहे तर दुसरीकडे तो वाढतच जात आहे या महामारीमुळे लाखो लोक मरत आहे तर दुसरीकडे तो वाढतच जात आहे या व्हायरसबद्दल माहिती झाल्यावरसुध्दा गेल्या ४-५ महिने विषाणूला रोखण्यासाठी काहीही पर्याय नव्हता कोणतीही व्हॅक्सीन तयार नव्हती त्यावर इफेक्ट दाखवत नव्हती त्यामुळे सरकारने कोरोना होऊच नये यासाठी उपाय आणि आदेश जारी केले आणि जर आपल्याला कोरोना व्हायरसपासुन मुक्त व्हायच असेल तर आपल्याला सरकारच्या आदेशांचे पालन करणे आणि काळजी घेणे गरजेचे आहे.या कोरोना महामारीने लोकांना जगणे शिकविले आहे. मानवाने जीवन थोडे किचकट पण सोपी बनविले आहे. हा कोरोना काळ गेल्यावर कोरोना नंतरचा देश खुप सामान्य,बळकट,स्वच्छ आणि जीवन सोपी असणार आहे कारण मरण्याची भिती माणसाला सर्व शिकवते.

कोरोना नंतरच्या देशात आपल्याला आताच्या जीवनशैली पेक्षा बदल घडुन आलेले दिसणार आहे. आजच्या परिस्थितीत आपल्याला उंच उंच घरे असलेल्या इमारती एकापेक्षा जास्त लोकांना सामावून घेण्यासाठी तयार केलेल्या आहेत परंतु कोरोना प्रादुर्भाव संपल्यानंतर कदाचित ही पध्दत टाळल्या जावू शकते कारण अशा उंच इमारतींमुळे ज्यात लोक मिळुन राहतात त्यांत स्वच्छता आणि आरोग्य विचारात घेणारे नसते कारण एकाच ठिकाणी एकापेक्षा जास्त लोकांचा संपर्क येतो मंदिरात,यात्रेला किंवा धार्मिक पुजेला जिथे गर्दी असते तिथे जाण्याचे लोक टाळतील पूजा ऑनलाईन करण्यास त्यांचा कल असेल. कोरोना काळ गेल्यावर सुध्दा स्वतःला इतरांपासुन दूर कसे ठेवता येईल यावर काळजी घेतल्या जाईल कार्यालयात, ऑफीसमध्ये जाणे लोक टाळतील जास्तीत जास्त कामे ऑनलाईन पध्दतीने घरी करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल लहानपणी प्रार्थनेला एक हात दूर ठेवून उभे रहायला सांगायचे त्यांचे महत्व लोकांना समजेल व हा नियम आयुष्यभर पाळतील लोक कुठेही कचरा टाकणे,थुंकणे,टाळतील कारण कोरोना गेल्यावरसुध्दा आता जी कुठेही न थुंकण्याची सवय लागली आहे. ती नंतरही शेवटपर्यंत राहील आणि यामुळे देश स्वच्द आणि सुंदर दिसेल देशातील सरकारच्या स्वच्छता अभियानाला प्रतिसाद मिळेल.या कोरोना महामारीने लोकांचे जगणे कठीण केले आहे पण कसे जगायचे हे सांगीतले आहे एक दिवस कोरोना जाईल पण लोकांना लागलेल्या सवयी जाणार नाहीत आणि हेच पाहिजे होते.

रोहित जांभुळकर

(बी.एस्सी. भाग ३)

कोरोना एक वैश्विक महामारी व त्याचे परिणाम

मैत्रिणींनो आरोग्यम् धनसंपदा हा सुविचार आपण अनेकदा ऐकला आहे परंतु या सुविचाराचे खरे महत्व आज आपल्याला समजले आहे. एक सुक्ष्म व्हायरस जो आपण उघड्या डोळ्यांनी पाहु शकत नाही त्याने आजच्या या धावत्या जगाला पुर्णपणे बंद करून संपूर्ण दुनियेची झोप उडविली असा व्हायरस म्हणजे कोरोना व्हायरस कोणाचेही यश हे त्याच्या आकारावर नव्हे तर त्याच्या कार्यक्षमतेवर अवलंबुन असते हे आपल्याला कळलेले आहे WHO ने याला साथीच्या रोगाचा विषाणु घोषित केले आहे. या विषाणुचा संसर्ग सर्वप्रथम डिसेंबर-२०१९ मध्ये चीनमधील वुहान या शहरात झाला हा संसर्ग वाढत जाऊन पुढे सर्व देशांमध्ये पसरला आज संपुर्ण जग या रोगाचा सामना करीत आहे.

आज पर्यंत मानवाने अनेक संकटाचा सामना केला आहे आणि त्या संकटातुन पुढे गेला आहे. परंतु कोरोना हा विषाणु इतका घातक आहे की त्यामुळे माणसाचा मृत्यू ही होत आहे म्हणुनच सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे.

अमेरिकेसारखा महासत्ता देश ही कोरोनापुढे हतबल झाला आहे ही आहे कोरोनाची करामत कोरोनाच्या करामतीमुळे आपल्या देशाची अर्थव्यवस्था कोसळली आहे आणि शाळा,कॉलेज ताळेबंद झाले आहे. वाहतुक व्यवस्था ठप्प झाली आहे आज आपला चेहरा मास्क ने झाकावा लागतो आहे तोही या कोरोनाच्या करामतीमुळे जवळपास सात महिने आपण संपुर्ण लॉकडाऊन आणि गर्दीच्या ठिकाणी न जाने व तसेच इतरांशी संपर्क टाळणे हे सर्व आपल्याला पथ्य पाळावे लागले या कोरोना काळात कित्येक लोकांचे व्यवसाय बंद झाले मजुरांना स्थलांतर करावे लागले तेही पायदळ लहान मुलांना भर उन्हात पायवाट तुडवावी लागली कित्येक लोकांची अन्नान्न दशा झालेली आपण पाहली आहे.

कोरोनाने आपल्याला जणु जगविणे, शिकविले आजच्या या आधुनिकीकरणाच्या युगात माणसं दुरावली गेली होती. त्यांच्यातील प्रत्यक्ष संवाद हा नाहिसा झाला होता. परंतु लॉकडाऊनमुळे सर्वजण घरीच होते त्यामुळे घरातील वातावरणात बदल झाला सतत व्यस्त असणाऱ्यांना घरच्यांसोबत वेळ घालवायला मिळाला त्यामुळे त्यांच्यातील प्रत्यक्ष संवाद वाढला कोरोना काळात गर्दी टाळायची होती त्यामुळे पर्यावरणालाही थोडा दिलासा मिळाला.

आज आपण कोरोनाशी लढत आहे,उद्या आणखी कुठल्यातरी रोगाशी लढावं लागणार त्यामुळे निसर्गाला धरून प्रगती करायची की, पर्यावरणाच्या विरूध्द जावुन मरायचे हे आपल्या ठरवायचे आहे आज आपण या संकटांवर मोठ्या प्रमाणात विजय मिळविला आहे. तेही आपले डॉक्टर्स,नर्स,सफाई कामगार आणि पोलीस कर्मचारी यांच्यामुळे त्यांनी त्यांच्या प्राणाचीही आहुती दिली आहे.लॉकडाऊन काळात अनेक लोकांनी व सामाजिक संस्थांनी माणुसपणाची जाण ठेवुन गरजुंची मदत केली त्या सर्वांना मी सॅल्युट करते

धन्यवाद !

कु. हर्षा र. ढगे
(बी.एस्सी. भाग २)

कोविड- १९ शेतकऱ्यांवर होणारे परिणाम

कोरोना या संसर्गजन्य आजारामुळे गेल्या २२ मार्चपासुन देश लॉकडाऊन आहे. याची झळ सर्वच क्षेत्राला बसलीय शहरातुन गावी परतणारे मजुर, कामगार, परप्रांतीय, शहरात भाजीमार्केटमध्ये होणारी उगीच गर्दी,गस्त घालणारे पोलीस,रूग्णांची काळजी घेणारी आरोग्य यंत्रणा,स्वतःची काळजी घेणारे शहरवासीय गरजुंना मदत करणारे दानशुर असे चित्र सध्या समाज माध्यमांची घरबसल्या दिसतेय शहरी संस्कृतीचा प्रभाव असणारे सामान्य जणही पॉझिटीव्ह रूग्णांच्या जाती शोधण्यात मग्न आहेत. असे असले तरी शेतकरी बांधवांवर या आजाराचे काय परिणाम होत आहेत याकडेही लक्ष गेले पाहिजे.आपल्याला माहितच आहे की भारताची ६५% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे ह्या कोरोना महामारीच्या संकटात शेतकऱ्यांच्या जीवनावर अनेक बरे वाईट परिणाम झाले आहे. लॉकडाऊनमुळे आज शेतात मजुर कामाला येत नाही त्यामुळे माल काढता येत नाही काढला तरी तो विक्रीसाठी बाजारात तर विकल्या जाईल याची कोणतीही हमी नाही यामुळे शेतकऱ्यांना हा माल आपल्या डोळ्यांदेखत शेतात तसाच सोडून धावा लागत आहे. कापूस,तुर,गहू,सोयाबिन सारखे पिके दुग्धव्यवसाय फळशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे अतोनात हालं होत आहे लॉकडाऊनमुळे बऱ्याचदा शहरात भाजीपाला,फळे ही नाशवंत पिके खराब होत आहेत किंवा कवडीमोल भावाने विकावी लागत आहेत. दुग्धव्यवसाय सुध्दा रेस्टॉरेंट व हॉटेल बंद असल्यामुळे अडचणीत सापडला आहे. उन्हाळी पिकासाठी शेतीची मशागत करावी लागते ते यंत्रसामुग्री सप्लाय चैन लागते जसे बी.बियाणे खते,जंतुनाशके ह्यांचा कच्चा मालाचा तुटवडा असल्यामुळे खरीप हंगामावर ह्याचा परिणाम होणार आहे ह्यातच बोगस बियाणेवाले माफिया ह्या परिस्थीतीचा फायदा घेऊन बाजारात बोगस बियाणे विक्री करण्याच्या तयारीत दिसत आहे असे झाल्यास पुढील वर्षी भारतात फुड सेक्यूरिटीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.एकींकडे बाजार बंद असल्यामुळे घरात माल पडून आहे व नविन कृषीकर्ज न मिळाल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे व त्यामुळे त्याची पुढील हंगामाची तयारी बारगळून पडली आहे ह्या आर्थिक समस्या व्यतिरीक्त बऱ्याच सामाजिक समस्या शेतकऱ्यांच्या जीवनात दिसत आहेत हातात पैसे नसल्यामुळे शेतकरी बरीच दुखणी अंगावर घरघुती उपाय करून काढत आहेत. कोरोनाप्रती एक भिती त्याला आपण 'कोरोनाफोबिया' म्हणता येईल ती शेतकऱ्यांमध्ये दिसत आहेत. अर्थशास्त्र म्हणतात व्यापारी लोकांमुळे देश चालतो... पूर्ण लॉकडाऊनमुळे कळलं की.... शेतात नांगर चालतो.... तेव्हा देश चालतो....

पण कोरोना महामारीच्या या वाईट परिणामामध्ये काही आशेचे किरण सुध्दा शेतकऱ्यांच्या जीवनात दिसत आहेत आपण जगाचे पोशिंदे आहोत व आपल्यामुळेच १४० कोटी जनता आज घरात राहण सुध्दा आनंदाने आपले पोट भरत आहे ही सकारात्मत भावना शेतकऱ्यांसाठी निर्माण झाली. खेड्यात सॅनिटायझेशनचे महत्व समजू लागले आहे त्यामुळे घाणीमुळे होणारे इतर आजार सुध्दा खेड्यात कमी झाले आहेत भविष्यात आपल्याला आपला १४० कोटीच्या जनतेला खाऊ घालायचे असेल तर फूड सेक्यूरिटीमध्ये आत्मनिर्भरता आणणे गरजेचे आहे कारण विदेशातून पर्याय कमी होतील हे विचार करणारे शेतकरी सुध्दा आपल्या भारतात आहे. पण मला प्रश्न पडतो की.. कोरोना रोग आला म्हणुन शहरातील गावाकडे धाव घेणारी माणसं गावाकडे दुष्काळ पडल्यावर, गावातील माणसांना शहरात बोलवून घेतील कां ? मोठमोठ्या हॉटेलमध्ये पार्टीमध्ये अन्नाची नासाडी करणारी माणसं खेड्यातील अन्नदात्याच्या मालाची बाजारात खरेदी करतांना घासाघिसी न करता खरेदी करतील कां ?

कु. अनुश्री चौधरी
(बी.एस्सी. भाग ३)

कोरोनाच थैमानं

२७ जानेवारी २०२० चीनच्या वुहान प्रांतातून आलेलं हे भयंकर वादळ या वादळाच नाव आहे कोरोणा ही एक अशी महामारी आहे. ज्याची लागण स्पर्शाने होते आणि या महामारीने आज फक्त आपल्याच देशाला नाही तर संपूर्ण जगाला वेढल आहे आणि त्यामुळे संगळीकडे अस्थिरता आणि चिंतेच वातावरण आहे देशाची अर्थव्यवस्था खोळंबली आहे.आणि ती सुरळीत करण्यासाठी आज प्रत्येक देश हा अग्निपथावर प्रयत्न करीत आहे.

